देशोन्नती

# शिवाजी महाविद्यालयात आझादी का अमृत महोत्सवाचे आयोजन

**बुलडाणा** ■ स्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे १० ते १५ ऑगस्ट या कालावधीत

देशोन्नती वृत्तसंकलन...

'आझादी का अमृत महोत्सव' साजरा करण्यात येणार आहे. भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्यदिनाचे संस्मरण म्हणून 'आझादी का अमृत महोत्सव' देशभर साजरा करण्यात येत आहे. या सोहळयात विद्यार्थ्यांनी सहभाग घेता यावा म्हणून अनेक वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

हा महोत्सव साजरा करण्यासाठी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि महाविद्यालयातील विविध विभागांतर्गत कार्यालयीन व महाविद्यालयीन परिसराची स्वच्छता करणे, वृक्षारोपण, रांगोळी स्पर्धा, भित्तीपत्रक स्पर्धा, प्रश्न मंजुषा स्पर्धा, सेंद्रिय शेती मार्गदर्शन कार्यशाळा या प्रकारचे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच १५ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात ध्वजारोहण आणि १३ ऑगस्टला प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले आहे. १३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत प्रत्येक घरावर स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत 'हर घर तिरंगा' चे आयोजन करण्यात आले आहे.या विविध कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपल्या सहभाग नोंदवावा असे आवाहन प्राचार्यांनी केले आहे. (का.प्र.)

Deshonnati Edition
Aug 7, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com